CNR No.MHKO200000242024	दाखल तारीख	-	०५.०१.२०२४		
	नोंदणी तारीख	-	०६.०१.२०२४		
	निकाल तारीख	-	१६.०३.२०२६		
	कालावधी	-	वर्ष	महिने	दिवस
			०२	०२	११

<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर</u>
<u>यांचे न्यायालयात (पिठासीन अधिकारी श्रीमती व्ही.ए.लावंड–कोकाटे)</u>

संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.१२/२०२४
निशाणी क्रं.७/ब सोबत
न्यायनिर्णय घोषीत दिनांक–१६ मार्च, २०२६

दुय्यम निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, शाहुवाडी गुन्हा नोंद क्रं.१७३/२०२३
महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे

फिर्यादी/तक्रारदार		महाराष्ट्र शासन, मार्फत दुय्यम निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, शाहुवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर
अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता		श्रीमती आर. आर. देशपांडे
आरोपी		भाऊसो विष्णू पलंगे, व.व.५२,
		रा. खोतवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
आरोपींतर्फे वकील		ॲड. श्री. के. बी. देसाई

गुन्हा घडलेचा दिनांक		१०.०८.२०२३
गुन्हा दाखल दिनांक		१०.०८.२०२३
दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक		०५.०१.२०२४
प्ली नोंदविलेचा दिनांक		०६.०५.२०२५
साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक		१६.०२.२०२६
न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक		--

न्यायनिर्णय दिनांक		१६.०३.२०२६
न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक		--

आरोपीची माहिती

अ.क.	आरोपीचे नांव	आरोपीस अटक दिनांक	आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक	दोषारोपातील कलम	आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले	आरोपीस झालेली शिक्षा	फौ.प्र.सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा
१.	भाऊसो विष्णू पलंगे	फौ.प्र.सं. कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटिस दिली.	०९.०९.२०२५	महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे	निर्दोष मुक्तता	---	---

भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

अ. अभियोग पक्ष

सा.क्रं.	साक्षीदारांचे नांव	स्वरुप	निशाणी
१.	कृष्णात मारूती पाटील	फिर्यादी	७
२.	रविंद्र राहजहंस सोनवणे	पंच	७

ब. बचावपक्ष

सा.क्रं.	साक्षीदारांचे नांव	स्वरुप	निशाणी
-	निरंक	-	-

क. न्यायालयामार्फत

सा.क्रं.	साक्षीदारांचे नांव	स्वरुप	निशाणी
-	निरंक	-	-

अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी

अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

अ.क्रं.	निशाणी क्रं.	वर्णन
१.	१०	फिर्याद

२.	११	पंचानाम

ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

अ.क्रं.	निशाणी क्रं.	वर्णन
--	निरंक	--

क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

अ.क्रं.	निशाणी क्रं.	वर्णन
१.	१	दोषारोपपत्र
२.	७	प्ली

ड.भौतिक वस्तु

अ.क्रं.	मुद्देमाल अर्टीकल नं.	वर्णन
१.	--	अं.३५ लि.क्षमतेचा एक प्लॅस्टिक कॅन त्यामध्ये अं. २५ लि. आंबूस उग्र वासाची गावठी हातभट्टी दारू भरलेला, दोन काचेचे ग्लास आंबूस उग्र वास येत असलेले

- <u>न्या य नि र्ण य</u> -

(घोषित दिनांक १६ मार्च, २०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षापात्र गुन्हयाचा खटला चालविण्यात आला.

<u>अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की :-</u>

०२. दिनांक १०/०८/२०२३ रोजी ९.०० वाजताचे सुमारास खोतवाडी, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे राहते घरी आरोपी बेकायदा अं.३५ लि.क्षमतेचा एक प्लॅस्टिक कॅन त्यामध्ये अं. २५ लि. आंबूस उग्र वासाची गावठी हातभट्टी दारू व दोन काचेचे ग्लास हा प्रोहीबिशन गुन्हयाचा मुद्देमाल विक्री करण्याचे उद्देशाने स्वत:चे कब्जात बाळगलेला मिळुन आला.

०३. फिर्यादीचे तक्रारीवरुन आरोपीविरुध्द राज्य उत्पादन शुल्क विभाग, शाहूवाडी, गु.र.क्र.१७३/२०२३ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये

शिक्षापात्र गुन्हा नोंदवणेत आला. सदर गुन्ह्याचा तपास श्रीमती व्ही.ए.पाटील, दुय्यम निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, शाहुवाडी यांनी केला असुन तपासादरम्यान त्यांनी मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला, तपास टिपण्ण नोंदविले, नमुना रासायनिक विश्लेषणाकरिता पाठवला व तपासाअंती आरोपीविरुध्द भारतीय फौजदारी प्रकिया संहिता कलम १७३ अन्वये अंतिम अहवाल न्यायालयात दाखल करण्यात आला.

०४. मी गुन्हयाचा सारांश आरोपीस वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने अपराध कबुल नाही असे सांगुन त्याच्याविरुध्द संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. त्याप्रमाणे आरोपीची प्ली (नि.क्र.७) नोंदवली. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी दोन साक्षीदाराचा साक्षीपुरावा नोंदवला असुन काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. तद्नंतर अभियोगपक्षाने नि.क्र.१२ कडे पुरसीस दाखल करुन पुरावा बंद करत असल्याचे न्यायालयास कळवले. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदवले असता आरोपीने खोटी केस असल्याचा बचावाचा पावित्रा घेतला, परंतु आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही पुरावा सादर केला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे-

अ.क्र	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दिनांक १०/०८/२०२३ रोजी ९.०० वाजताचे सुमारास खोतवाडी, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे राहते घरी आरोपीने त्याचे स्वत:चे फायदयाकरीता बिगर परवाना बेकायदा अं.३५ लि.क्षमतेचा एक प्लॅस्टिक कॅन त्यामध्ये	नकारार्थी

	अं. २५ लि. आंबूस उग्र वासाची गावठी हातभट्टी दारू व दोन काचेचे ग्लास हा प्रोहीबिशन गुन्हयाचा मुद्देमाल विक्री करण्याचे उद्देशाने स्वत:चे कब्जात बाळगलेला मिळुन आला आणि त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ?	
२.	कोणता आदेश ?	आरोपीची निर्दोष मुक्तता

- <u>कारणमिमांसा</u> -

<u>मुद्दा क्र.१ करिता:-</u>

०६. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

०७. अभियोगपक्षाचे मुख्य साक्षीदार क्रं.१ कृष्णात मारूती पाटील (फिर्यादी) यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.१०/०८/२०२३ रोजी ते राज्य उत्पादन शुल्क, शाहुवाडी येथे जवान या पदावर कार्यरत असताना त्यादिवशी खोतवाडी गावी एक इसम गावठी हातभट्टी दारू चोरून विक्री करीत असलेची बातमी मिळाली. त्यानुसार दुय्यम निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, शाहुवाडी यांना दोन पंचाना बोलावून घेतले. त्यांनतर ते, पंच व इतर स्टाफ खाजगी वाहनाने घटनास्थळी पोहोचून छापा टाकला असता एक इसम बेकायदेशिररित्या चोरुन हातभट्टी दारु विक्री करीत असलेचे आढळून आला. त्याने त्याचे नाव भाऊसो विष्णू पलंगे असल्याचे सांगितले. त्या इसमाच्या ताब्यातून अं.३५ लि.क्षमतेचा एक प्लॅस्टिक कॅन त्यामध्ये अं. २५ लि. आंबूस उग्र वासाची गावठी हातभट्टी दारू व दोन काचेचे ग्लास हा प्रोहीबिशन गुन्हयाचा मुद्देमाल मिळून आला. त्यानंतर दुय्यम निरिक्षक पाटील यांनी पंचनामा करुन मुद्देमाल जप्त करुन घेतला. त्यांनी सदर कारवाईनुसार अभियोगपक्षातर्फे फिर्याद नि.क्र.१० दिली. आरोपी

न्यायालयात हजर असुन त्यांनी आरोपीस ओळखले. सदर साक्षीदाराचा आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे कबुल केले की, दि.१०/०८/२०२३ रोजी त्याच्या वरिष्ठांनी दिलेला आदेश मौखीक स्वरुपाचा होता. ते ज्या खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले त्या खाजगी वाहनाचा नंबर, चालकाचे नाव व पत्ता फिर्यादी साक्षीदार सांगू शकलेला नाही. त्यांनी कारवाईच्या वेळी आरोपी यांचे आधारकार्ड व मतदार ओळखपत्र पाहिले नव्हते. येथे एक बाब नमुद करणे आवश्यक आहे की, आरोपीचे विधीज्ञांनी आरोपीच्या ओळखीबाबत व कारवाईचे आदेश नसलेबाबत आक्षेप नोंदवला असुन अभिलेखावर कारवाईचे आदेश दाखल नाहीत तर घटनास्थळावरील आरोपीची ओळख पटवण्यासाठी कोणताही पुरावा पडताळलेचे दिसत नाही.

०८. अभियोगपक्षाने घटनास्थळ व मुद्देमालाची जप्ती सिध्द करणेसाठी अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार क्रं. २ रविंद्र राजहंस सोनवणे यांचा साक्षीपुरावा नोंदवला असुन त्यांनी त्यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दि.१०/०८/२०२३ रोजी त्याला राज्य उत्पादन शुल्क, शाहुवाडी विभाग यांनी त्यांच्या कार्यालयात बोलावले होते. त्यांचे समक्ष नि.क्र.११ चा घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. साक्षीदारास घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवला असता त्यातील मजकुर खरा व बरोबर असलेचे सांगितले. सदर साक्षीदाराने आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपसामध्ये साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

०९. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या मौखिक पुराव्याचे व कागदोपत्री पुराव्यांचे एकंदरीत मूल्यमापन करता असे दिसुन येते की, जरी फिर्यादी यांनी आरोपीने प्रस्तुतचा गुन्हा केला आहे असे कथन केले असले तरी त्यांना कारवाईसाठी वापरणेत आलेल्या खाजगी वाहनाचा नंबर, चालकाचे नाव व पत्ता सांगता आलेला नाही. तसेच आरोपीची घटनास्थळावर ओळखपत्राद्वारे ओळख पडताळणी केल्याचे दिसत नाही. तसेच जरी घटनास्थळ पंचाने त्याचे समक्ष मुद्देमाल जप्त झाला असे सांगितले असले तरी सदर पंचाने घटनास्थळाबाबत तसेच जप्त मुद्देमालाबाबत सविस्तर कथन केलेले नाही. घटनास्थळाबाबत निश्चितच संशय निर्माण होतो. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा

संशयापलीकडे जावुन सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. घटनास्थळावरील कोणताही प्रत्यक्षदर्शी त्रयस्त साक्षीदार तपासल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर कामी प्रयोगशाळेचा अहवाल दाखल केलेला नाही. अभियोगपक्षाचा पुरावा आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता पुरेसा नाही. अशा परिस्थितीत आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशीररित्या देशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगुन असताना मिळुन आलेचे अभियोग पक्षाने रास्त शंकेपलिकडे जावून सिध्द केलेले नसल्याचे मतास मी आले आहे. म्हणून मी **मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी** नोंदवित आहे.

मुद्दा क्र.२ करिता-

१०. मुद्दा क्र.१ चे उत्तरावरुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलिकडे सिध्द केला नसल्यामुळे आरापी हा प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत कामी पिडीत अगर नुकसानग्रस्त कोणीही नसलेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५७-अ प्रमाणे नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता नाही. जप्त प्रोहीबिशनचा मुद्देमाल हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांचेकडे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे पुढील विल्हेवाट लावण्यासाठी पाठविणे न्यायोचित होणार आहे. अंतिमत: मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे-

- अंतिम आदेश -

१.	आरोपी **भाऊसो विष्णू पलंगे,** रा. खोतवाडी,ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.
२.	आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.
३.	जप्त मुद्देमाल अं.३५ लि.क्षमतेचा एक प्लॅस्टिक कॅन त्यामध्ये अं. २५ लि. आंबूस उग्र वासाची गावठी हातभट्टी दारू हा मुद्देमाल अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांचेकडे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे पुढील विल्हेवाट लावण्यासाठी पाठविणेत यावा. दोन काचेचे ग्लास मुल्यहिन असलेने अपिल

	कालावधीनंतर नाश करणेत यावेत.
४.	आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) प्रमाणे मा. अपिल न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी रक्कम रुपये १५,०००/- वैयक्तीक जातमुचलका लिहून दयावा.
५.	मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रंजना शांतिलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुळशीराम गुप्ता क्रिमी.अपिल (एस.टी.) नंबर ३९०/२०१९ या न्यायनिवाडयात निर्देशित केलेप्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2026.03.16 17:34:57 +0530

कळे-खेरीवडे.
दिनांक.१६.०३.२०२६

(व्ही.ए.लावंड-कोकाटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे-खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.